


Scanned with OKEN Scanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

(भाग—०३)

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मो. ९४०४०००३९८.



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका - 03




| अ.क्र. | प्रकरण | |
|---|---|---|
| • | शुभेच्छा – प्रा. कार्तिक पाटील | 05 |
| • | शोध महानवाचा : संपादकीय – प्रा. प्रफुल एम राजुरवाडे | 07 |
| 1 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा – प्रा. प्रकाश उत्तमराव हनवते | 13 |
| 2 | भारतीय वर्ण व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार डॉ. अतुल म. महाजन | 20 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंबनियोजनावरील विचार – प्रा. डॉ. महेंद्र गजधाने | 26 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक व आर्थिक विचार – प्रा. पितांबर विठोबाजी पिसे | 30 |
| 5 | डॉ. आंबेडकरांची सामाजिक चळवळ – डॉ. प्रा. दिपक महाजन | 35 |
| 6 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य – प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | 43 |
| 7 | स्त्रि स्वातंत्र्याचा जाहीरनामा – हिंदू कोड बिल प्रा. डॉ. उषा खंडाळे | 49 |
| 8 | महिलांचे मुक्तीदाता . डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. कैलास फुलमाळी | 54 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक कार्य – प्रा. रामा गोरोबा कांबळे | 60 |
| 10 | स्त्री उत्थानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलाचे योगदान – प्रा.डॉ.नथ्थु सिताराम गिरडे | 63 |
| 11 | बाबासाहेबांचे स्त्रीमुक्तीचे विचार व कार्य प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर | 67 |
| 12 | महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कल्याणासंबंधी विचार –प्रा. डॉ. सारीका चौधरी | 73 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण – डॉ. संदिप बाळकृष्ण सातव, प्रा. हुमेश्वर डी. आनंदे, प्रा. अरूण व्हि. पिसे | 78 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार- डॉ. राहुल गोपीचंद सनेर | 84 |
| 15 | ~~डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती – प्रा. राहुल मोरेश्वर लभाने~~ | 88 |
| 16 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक .- डॉ.शशिकांत गोकुळ साबळे, | 96 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे | 103 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समरसता तत्त्वातून निरोगी अर्थव्यवस्थे वरील परिणाम – एक विवेकशील दृष्टीकोन डॉ. हितेश मा. दडमल | 106 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकशाही – डॉ. संदिप बाळकृष्ण सातव, | 112 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिऊर्जेतुन साकारलेले कवी – मनोहरांचे चिंतनकाव्य संशोधक – तुळशीराम शंकर कांबळे | 118 |
| 21 | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही तत्वज्ञान – प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम . | 122 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्य समाजवादाची संकल्पना : एक चिकित्सक अवलोकन डॉ. किर्तीकर वाल्मिक भीमराव | 130 |
| 23 | डॉसाम्यस्थळे आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्यातील. – प्रा. डॉ. विशाखा कायंदे | 135 |
| 24 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतर घोषणा: एक ऐतिहासिक अवलोकन - डॉ. सुर्यकांत महादेवराव कापशीकर, | 142 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांतीचे ऐतिहासिक महत्व – प्रा. संतोष मोहकार | 151 |



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waron.



Scanned with OKEN Scanner



## बाबासाहेबांचे स्त्रीमुक्तीचे विचार व कार्य

प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर

डॉ. आंबेडकरानी स्त्री वर्गाला सामाजीक व राजकीय हक्क प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या सभां मधून परीषदामधून आपले स्त्रीमुक्तीचे विचार व्यक्त केले व यासाठी कार्यही केले. अस्पृश स्त्रीयांचा प्रश्न, मनुस्मृतीचे दहन, देवदासीप्रथा, स्त्री कामगार या बाबतीत त्यांनी स्त्रीयांनों उपदेश देऊन त्याच्यात परीवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले व त्यांना आपल्या अस्पृश आंदोलनात सहभागी करून घेऊन त्यांना स्त्री शिक्षणास व स्त्री स्वातंत्र्यास प्रवृत्त केले. हिंदु कोड बीलाच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याचे व अधिकाराचे स्वप्न बाबासाहेबानी पाहिले होते. घटस्फोट, एकपत्नीत्व, संपत्तीत अधिकार, आर्तजातीय विवाह, दत्तक विधान, पोटगी कायदा, वारसा हक्क इत्यादी अधिकार स्त्रीयांना मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. परंतु हिंदु कोड बीलाच्या पराभवामुळे ते अस्वस्थ झाले. पुढे ते बील सरकारने स्वीकारल्यामुळे स्त्रीयांना त्याचे हक्क व अधिकार प्राप्त होऊन आज समाजात त्यांना मानाने जगण्याचा अधिकार डॉ. बाबासाहेबामुळे प्राप्त झाला. यादृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री मुक्तीचे पुरस्कते व स्त्री उध्दारक ठरतात.

### प्रस्तावना :-

भारतीय समाजात स्त्रीयांचा दर्जा नेहमी पुरूषा पेक्षा निम्न राहिला आहे. त्यांना पुरूषाबरोबरीचा दर्जा व स्थान अजूनही प्राप्त झालेले नाही. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीयांना मानाचे स्थान असून उपनयन संस्कारही केल्या जात होते. परंतु उत्तर वैदीक काळात स्त्रीयांच्या दर्जात घसरण होऊन पुढे चुल आणि मुल इतकेच क्षेत्र मर्यादित झाले. प्राचीन काळात काही राजवंशात स्त्रीला मानाचे स्थान दिलेले आढळते.

पुढे मध्ययुगीन काळात स्त्रीला गुलाम समजून ती एक उपभोग्य वस्तू बनली व स्त्रीयांचे बाजार भरवून तीला विकल्याही गेले. परकीय आक्रमणामुळे या काळात मुलीचा जन्म नकोसा झाला. त्यामुळे स्त्री जन्मताच तीला मारल्या गेले. परंतु पुढे आधुनिक काळात ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यात थोडा फार बदल होऊन नविन विचार समाजात रूजले त्यामुळे स्त्रीयांच्या प्रश्नाकडे व तिच्या स्वातंत्र्याकडे लक्ष देण्याची गरज वाटू लागली व त्यातुनच पुढे पाश्चिमात्यकरणामुळे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला जाऊन डॉ. राजराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्री फुले, फातेमा बेगम, महात्मा गांधी, विनोबा, गो. गो. आगरकर इत्यादींनी स्त्री स्वातंत्र्याचे विचार मांडून स्त्री मुक्तीचा विचार पुढे आला यातूनच सतीप्रथा बंदी कायदा, विधवा विवाह कायदा इत्यादी कायदे झाले याच पक्तितील स्त्री सुधारक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होय. त्यांनी खऱ्या अर्थाने दलितोद्धार आंदोलनात स्त्रियांना सामावून घेऊन हिदु कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रिच्या हक्कासाठी व अधिकारासाठी प्रयत्न केले व त्यांना पुढे त्यांचे अधिकार मिळवून दिले. या दृष्टीने डॉ. आंबेडकरांचे स्वतंत्र स्त्री विषयक विचार महत्वाचे आहे.

Assistant Professor
...Mahavidyalaya, Waro..

उद्दीष्ट्ये :–

(१) बाबासाहेबाचा स्त्री विषयक दृष्टीकोन जाणुन घेणे.

(२) बाबासाहेबाच्या स्त्री सुधारणाचे महत्व स्पष्ट करणे.

गृहीतके :–

(१) बाबासाहेबांच्या स्त्री सुधारणा कार्यामुळे स्त्रियांना कायद्याने अधिकार व हक्क प्राप्त झाले.

अस्पृशतोध्दार :–

अस्पृशतेमुळे दलितांनाही मानहानी सहन करावी लागते याचा प्रत्यक्ष अनुभव बाबासाहेबांनी घेतला होता. म्हणून दलितांनाही इतर समाजाच्या बरोबरीने सामाजीक, राजकीय व आर्थिक अधिकार मिळावे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी दलितांना त्यांचे अधिकार मिळावे व त्यांना जाणीव व्हावी म्हणून स्वातंत्र्य व समानतेच्या तत्वाचा पुरस्कार करून त्याबद्दलची जाणीव त्यांच्यात निर्माण करण्यांचा त्यांनी प्रयत्न केला व यासंदर्भात जागृती घडवून आणून त्यांनी संघर्षाचा पवित्रा घेतला यासाठी महात्मा फुल्यांचा वारसा पुढे चालवून सनातनशाही विरूध्द बंडाचे निशान उभारले व दलितोध्दाराच्या चळवळीला त्यांनी स्त्रियांनाही सामावून घेऊन स्त्रीमुक्ती व उद्धारासाठी प्रयत्न सुरू केले व स्त्रीयांना बरोबरीचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी आपले स्वतंत्र विचारही मांडले. बाबासाहेबांना स्त्रीप्रश्नाबाबत आपली पत्नी रमाबाईला पाठविलेल्या पत्रात म्हणतात, 'मी नारी उन्नती साठी व उध्दारासाठी लढणारा एक योध्दा आहे... एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप मी त्या समाजातील स्त्रीयांच्या प्रगतीवरून करतो'.

बाबासाहेबांनी दलितांना त्यांचे हक्क व अधिकार मिळण्यासाठी प्रथमता त्यांच्यात जागृती करून अस्पृशतोध्दाराचे कार्य हाती घेतले. यासाठी मंदीर प्रवेश, सहभोजन, सत्याग्रह, संघटना, वस्तीगृहाची स्थापना, सामाजीक क्रांती, वृत्तपत्र, विधेयक दुरूस्ती, मनुस्मृती दहन, अधिवेशने, कायदे इत्यादे वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब केला याच बरोबर स्त्री मुक्तीचाही मार्ग स्विकारून जागृती घडवून आण्याचा प्रयत्न केला व त्यांनाही या अस्पृशोध्दाराच्या कार्यात सामावून घेतले. २८ डिसेंबर १९२७ रोजी स्त्रीयासाठी बाबासाहेबांनी वेगळे भाषण केले तेंव्हा स्त्रीयांना संबोधतांना अस्पृशोध्दारासंबंधी स्त्रीयांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देतांना बाबासाहेब म्हणतात. "घर प्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री–पुरूष एकत्र येऊन सोडवितात. त्याचप्रमाणे स्त्रीयांनी सुध्दा हे अस्पृशोतध्दाराचे कार्य स्वतःच्या अंगावर घेतले तर या कामात लवकर यशप्राप्ती होईल ... यासाठी तुम्ही नेहमी परिषदेत हजर राहिले पाहिजे ... व अस्पृशता निवारण्याचा प्रश्न हा पुरूषांचा नसून स्त्रियांचा आहे ..." अशी जबाबदारीची जाणीव ते स्त्रीयांना करून देतात.

पुढे जुन्याचालीरीती व पोशाखा बद्दल बाबासाहेब स्त्रीयांना म्हणतात, 'तुम्ही जुन्या व गलिच्छ चालीरीती सोडून देऊन ... ज्या गोष्टीमुळे आपण अस्पृश आहोत असे ओळखतात त्या साऱ्या गोष्टी आता तुम्ही बंद केल्या पाहिजेत... तुमची लुगडी नेसण्याची पध्दती ही वरीष्ट वर्गातील स्त्रीयासारखी असली पाहिजे व चांदी कथलाचे भाराभर दागिने घालण्यापेक्षा व त्यावर खर्च करण्यापेक्षा चांगल्या कपड्यावर पैसा खर्च करा असे आवाहनही बाबासाहेब करतात. व स्त्रीयांना स्वच्छतेने वागण्याची खबरदारी देऊन घरात कोणतेही अमंगल होऊ नये यासाठी काळजी घेण्यासही सांगतात.

बाबासाहेबांना स्त्री शिक्षणाचे महत्व असल्यामुळे स्त्रीयांनी सुध्दा शिकले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता कारण त्याशिवाय प्रगती होणार नाही हे ते जाणून होते म्हणून बाबासाहेब म्हणतात, 'तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या दोन्ही गोष्टी पुरूषासाठीच नाही तर स्त्रीयासाठी ही आवश्यक आहे. व पुढील पीढी सुधारायची असेल तर मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका' असा इशाराही ते देतात.

बाबासाहेबांनी महाडच्या सत्याग्रहात केलेल्या या भाषणामुळे अस्पृश स्त्रीयात क्रांतीकारी बदल घडून आला. बाबासाहेबांच्या केलेल्या पेहरावा संबंधीच्या आवाहनाला मुर्त रूप देण्यासाठी अनेक स्त्रीयांनी बदल घडवून आणला. या सत्याग्रहात जमलेल्या स्त्रीयाच्या वतीने श्रीमती विठाबाई ह्यांनी, बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे वागू असे आश्वासन दिले. विशेषता कोकणातील ठाणे कुलाबा येथील अस्पृश्य स्त्रिया ह्या गुडघ्याच्या वर मांडीपर्यत लुगडे नेसत त्यावरून त्याची जात लक्षात यायची परंतु बाबासाहेबाच्या भाषणाचा त्याच्यावर प्रभाव पडून त्यांनी अधिवेशच्या दुसऱ्या दिवशीच लुगडे

नेसण्याच्या पध्दतीत बदल करून ब्राम्हणी पध्दतीने पायघोळ नववारी लुगडे नेसुन त्या अधिवेशन स्थळी आल्या. यामुळे आनंद होऊन बाबासाहेबांनी त्या स्त्रीयांना आपापल्या गावी जातांना चोळी–बांगडी करीता आठ–आठ आणे दिले.

बाबासाहेबाच्या महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहानंतर स्त्रीयामध्ये परीवर्तन घडून येऊन अस्पृश स्त्रीयांचे आचार विचार बदलले. मोठ्या संख्येने स्त्रीया बाबासाहेबाच्या सभा संमेलनात भाग घेऊ लागल्या त्यामुळे स्त्री संघटना तयार होऊन सभा संमेलनातूनही स्त्रीया व्यासपीठावर आपले विचार मांडू लागल्या. मोर्चे मिरवणुकीत सहभागी होऊन दलितोध्दराच्या चळवळीतही त्या बाबासाहेबासोबत सहभागी होऊ लागल्या. यातूनच पुढे स्त्री अस्पृशता कार्यक्रमाच्या कार्याची सुरवात झाली. एकूणच अस्पृश स्त्रीयांमध्ये घडून आलेल्या या परिवर्तनामागे बाबासाहेबांचा स्त्री–पुरूष समानतेचा उदार दृष्टीकोन दिसुन येतो.

अस्पृश स्त्रीयांच्या सर्वांगीण सुधारणे संबंधी सूचना करतांना बाबासाहेब म्हणतात 'आजपासुन आपण आपल्या उन्नतीसाठी, स्वातंत्र्यासाठी विशेष जोमाने संघटनेने कार्याला लागले पाहिजे व आपल्या गळ्याभोवती स्पृश हिंदूनी व सरकारने गुलामगीरीचा पाश घातला आहे, तो ताडकन तोडून आपले स्वातंत्र्य मिळविले पाहिजे व यासाठी व्यावहारीक आणि राहनीमानात सुधारणा घडवून आणली पाहिजे...' तसेच पुरूषासोबत काम करतांना बाबासाहेब त्यांना म्हणतात की, 'पुरूषवर्गाच्या सहकार्याने आपले कार्य मोठ्या प्रमाणावर चालेल अशी मदत करावयास तुम्ही नेहमी तयार असले पाहिजे. व पुरूषवर्गाला त्याच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून देऊन व्यसनापासुन व इतर विधातक कृत्यापासून दूर ठेवण्यास तुम्ही प्रयत्न केले पाहिजे ..." असे आवाहनही ते अस्पृशस्त्रीयांना करतात.

मनस्मृतीचे दहन :–

बाबासाहेबांनी सामाजीक समानता आणि न्याय मिळविण्यासाठी व दलितांना त्यांचे अधिकार व हक्क मिळवून देण्यासाठी अनेक चळवळी केल्या व त्यात स्त्री प्रश्नाला प्राधान्य दिले. त्यामुळे या चळवळीत व आंदोलनात स्त्रीयाही सहभागी झाल्या होत्या. महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याच्या सत्याग्रहाचे आंदोलन २५ ते २७ डिसेंबर १९२७ रोजी आयोजीत करून या आंदोलनात स्त्रीला हीन लेखणारी व त्यांना अधिकारापासुन वंचित ठेवणाऱ्या गुलाम समजणाऱ्या 'मनुस्मृती' च्या दहनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. कारण या मनुस्मुतीत स्त्रीला स्वातंत्र्याचा अधिकार अमान्य करून स्त्रीला घटस्पोटाचा अधिकार नाकारला होता व संपत्तीचा ही अधिकार दिला नव्हता म्हणून मनुस्मृतीचें दहन करण्यासाठी अनेक स्त्रीया या सत्याग्रहात व परीषदेत सामील झाल्या होत्या तेव्हा बाबासाहेबांनी या मनुस्मृतीचे दहन करून हिंदु समाजातील सामाजीक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. व स्त्रीया समोर त्यांनी भाषणही करून त्यांना अस्तित्वाची जाणीव करून दिली. या मनुस्मृती बद्दल बाबासाहेब म्हणतात "मनुने घटस्फोटाला बंदी घालून पत्नीला पतीशी बांधून ठेवले. परंतु पुरूषाला मात्र त्याने स्वातंत्र्य दिले. मनूच्या नियमाप्रमाणे, पती पत्नीचा त्याग करू शकतो इतकेच नव्हे तर तिला विकूही शकतो. मात्र नवऱ्याने तीला सोडून दिले किंवा विकले तरी पती म्हणून त्याचा तिच्यावरचा हक्क नष्ट होत नाही. याचा अर्थ हा आहे की नवऱ्याने टाकलेली किंवा विकलेली स्त्री दुसऱ्या पुरूषाबरोबर राहिली तरी त्याची पत्नी होऊ शकत नाही. हि कल्पना महाभयंकर आहे ..."

सायमन कमीशन :–

सायमन कमीशन १९२८ मध्ये भारतात आले तेव्हा सायमन कमीशन समोर साक्ष देतांना बाबासाहेबांनी वयात आलेले सर्व स्त्री–पुरूषांना मतदनाचा अधिकार असावा अशी मागणी सर्वप्रथम केली. यावरून त्यांची स्त्री उत्थानाची भूमीका लक्षात येते.

वेश्या व देवदासी प्रथा :–

बाबासाहेबांनी १९३६ च्या येवला येथे धर्मातरांची घोषणा केल्यानंतर त्यांच अनुयायांनी देवतांना वाहिलेल्या स्त्रीया म्हणजेच देवदासी, जोगतीणी, मुरळी व पुरूष म्हणजेच वाघे, पोतराज यांना धर्मातरास प्रवृत्त करण्यासाठी मुंबईच्या दामोधर हॉलमध्ये एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बराच अस्पृश समाज तसेच देवदासी, वेशावृत्ती करणाऱ्या स्त्रीया व पोतराज सहभागी झाले होते. त्यात बाबासाहेब आपले परखड विचार व्यक्त करतांना म्हणतात, '... तुम्ही आज धर्मातर करण्याची तयारी दाखविली आहे. परंतु तुमच्या निश्चयाने मला समाधान वाटत नाही ...' तुम्हाला जर आमच्या सोबत यावयाचे असेल तर तुम्ही प्रथम हा आपला दुर्गधित आयुष्यक्रम सोडून दिला पाहिजे. तुमच्या मलीन वृत्तीचा त्याग

केला पाहिजे हे करण्यास तुम्ही तयार असाल तर आमचे बरोबर या नाही तर आमचे बरोबर येऊ नका" असा इशाराही ते देतात व तो व्यवसाय सोडला नाहीतर कांही तरूण स्वयसेवकांना कामाठीपुऱ्यात पाठवून त्या व्यवसायाचे उच्चाटन करण्याची धमकी देण्यासाठी बाबासाहेब कसूर करीत नाही. यावरून त्यांच्या मनातील या व्यवयाबद्दलची चीड लक्षात येते. स्त्रीयांनी जबाबदारीने वागावे. शीलाचे पालन करावे असे त्यांना वाटत होते.

पुढे स्त्री चारीत्र्याबाबत बाबासाहेब म्हणतात, 'स्त्रीजात समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांना चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहीणी होणारी स्त्री उत्तम कुलातील असावी अशी प्रत्येक जण अपेक्षा करतो. आपल्या मुलाबाळांचा आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नावलौकीक स्त्रीयांच्या शीलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्रीवर्गाला प्राप्त झाली आहे ... हे जाणून आपल्या मलीन आयुष्यक्रमाचा त्याग करून स्वतःच्या जातीचा दर्जा व नावलौकीक वाढविला पाहिजे". असे सांगून तुम्ही खायचे काय, जगायचे कसे हा प्रश्न माझा नाही. तुम्ही काय काम करणार हे मी सांगणार नाही तर तुम्ही वाटेल ते करा असे सांगून इतर कष्ट करून जगणाऱ्या स्त्रीयांचेही व महाभारतातील द्रौपदीचे उदाहरणही ते देतात. यामुळे सभेत गोधळ होऊन त्या स्त्रीया रागाने निघून गेल्या त्यानंतर बाबासाहेबांनी त्या स्त्रीयांचा प्रश्न कधीच हाती घेतला नाही.

बाबासाहेब स्त्रीयांना लग्नाच्या बाबतीतही सल्ला देतांना म्हणतात 'लग्न करण्याची घाई करू नका. लग्न म्हणजे जबाबदारी लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याइतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लग्न लादू नका. जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवावे की अती जास्त मुले हे दुष्ट कृत्य आहे. ... लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा ..." तसेच लग्नाच्या बाबतीत बाबासाहेबानी आर्तजातीय विवाहाचा पुरस्कार केला होता.

**स्त्री कामगार :–**

बाबासाहेब हे स्त्रीयांच्या सुधारणाचे पुरस्कर्ते होते. पुरूषाबरोबरच स्त्रीयांनाही समानता असावी असे त्यांना वाटे म्हणून त्यांनी नागपूर येथे झालेल्या शे. का. ते. च्या महिला परिषदेत स्त्री कामगारासाठी अनेक मागण्या सरकारकडे केल्या त्या संदर्भात बाबासाहेब म्हणतात पती पत्नीला घटस्फोट घेण्याचा अधिकार असलेला कायदा सरकारने करावा आणि बहुपत्नीत्वाची प्रथा कायद्याने बंद करावी अशी मागणी यावेळी बाबासाहेबांनी केली. इतकेच नाही तर मजूर व कामकरी स्त्रीयासाठी २१ दिवसाची किरकोळ रजा, १ महिण्याची हक्काची रजा व दुखापत झाल्यास नुकसान भरपाई, तसेच २० वर्षाची नोकरी झाल्यावर किमान दरमहा १५ रू. पेंशन योजना स्त्री कामगारांसाठी सरकारने करावी असा ठराव या परिषदेत संमत करून तो मजूर मंत्रालया मार्फत व्हाईसरायलाही पाठविण्यात आला.

याशिवाय गिरण्यात काम करणाऱ्या स्त्री कामगारांवर देखरेख ठेवण्यासाठी स्त्रीयाचीच नियुक्ती करावी अशा मागणीचा ठरावही करण्यात आला. तसेच महिलांच्या शिक्षणाकरीता प्रातीक सरकारने जिल्ह्याच्या ठिकाणी सरकारी खर्चाने १०० मुलींचे वस्तीगृह काढावे तसेच दुय्यम व उच्च शिक्षणाकरीता अस्पृश्य विद्यार्थीनीस शिष्यवृत्त्या मिळाव्या व प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. अशा प्रकारचे ठराव स्त्री उत्थानाच्या बाबतीत मांडल्या गेले. या परिषदेत अनेक स्त्रीयांनी निर्भिडपणे व्यासपीठवरून आपले विचारही व्यक्त केले या परीषदेतील स्त्रीयांची उपस्थिती पाहून त्यांनी महिलांचे कौतुक करून समाधानही व्यक्त केले. या प्रसंगी बाबासाहेब म्हणतात, 'स्वच्छतेने राहण्यास शिका व दुर्गुणाचा त्याग करा. आपल्या मुलांना शिक्षण देऊन त्याच्यात महत्वाकांक्षा जागृत करा. ते थोर पुरूष होणार आहे असे त्यांच्या मनावर बिंबवा त्यांच्यातील न्युनगंड नाहीसा करून त्यांच्या लग्नाची घाई करू नका असे ही सुचवतात ...".

पुढे जेव्हा बाबासाहेब मजूरमंत्री झाले असतांना त्यांनी पुरूषाबरोबरच स्त्री कामगारासाठीही विविध सवलती मंजूर करवून घेतल्या. तसेच स्त्रीयांच्या प्रसुती काळात स्त्री कामगारांना पगारी रजा मिळण्याची सोय करून दिली होती. तसेच १९३१ मध्ये बाबासाहेबाच्या मजूर पक्षाचे आमदार पी. जी. सोहम यांनी बाबासाहेबांच्या सांगण्यावरून व प्रेरणेने विधिमंडळात कुटुंबनियोजनाचा ठरावही मांडला होता.

**हिंदु कोड बील :–**

१९३०–३१ च्या काळात विवाह आणि वारसा या बद्दलच्या रूढीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी कायदे करण्यात यावे अशी मागणी जोर धरून यासंदर्भात १९३४ मध्ये हिंदु कायद्याचा अभ्यास करून त्यामध्ये कोणत्या सुधारणा

आवश्यक आहे यासाठी एखादा आयोग स्थापन केला जावा असा प्रचार ह्या काळात सुरू झाला होता. व यातूनच १९४१ मध्ये हिंदु कायद्याचे एकत्रीकरण करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९४१ मध्ये बी.एन.राव यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नेमली या समितीमुळे आखिल भारतीय महिला परीषदेने स्त्रीयाच्या म्हणून ज्या मागण्या सादर केल्या त्यात वारसा विवाह, पालकत्व, स्त्री पुरूष समान हक्क, बहुपत्नित्वाला बंदी, घटस्फोटचा हक्क मान्य इत्यादी गोष्टीचा समावेश होता. तेव्हा या समितीने आपला अहवाल सादर करतांना कायद्याच्या सहितीकरणाची आवश्यकता प्रतिपादन केली व त्यादृष्टीने या राव समितीचे हिंदु कोड विधेयकाचा मसूदा तयार केला व तो १५ ऑगष्ट १९४४ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात सादर केला. परंतु तत्कालीन परीस्थितीमुळे त्यावर चर्चा झाली नाही.

तर बाबासाहेब भारताचे कायदेमंत्री झाल्यावर ते विधेयक मंजूर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. पुढे भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर सामाजीक व आर्थिक व राजकीय समानतेसाठी पं. नेहरूनी हिंदु सहिता विधेयकाची आवश्यकता मान्य केली व ते बील मंत्रीमंडळात पास करवून घेण्याचीही घोषणा केली. त्यामुळे बाबासाहेबांनी हे विधेयक तयार करण्याचे काम हाती घेऊन विधेयकाची अभ्यासपूर्ण कोटेकारपणे मांडनीकरून ते कायदेमंडळात मांडले. वास्तविक जातीभेद विरहीत हिंदु समाजामध्ये एक सुसत्रपण निर्माण करून स्त्रि पुरूषात समता निर्माण करणे हे या बीलाचे मुख्य उद्दिष्ट होते व आधुनिक पुरोगामी विचाराने समाजव्यवस्थेची बांधणी करणे हाही यामागचा हेतू होता. यादृष्टीने या बीलाचे ९ भाग, १३९ कलमे व ७ परिशीष्टे तयार करण्यात येऊन स्त्री स्वातंत्र्याची व अधिकाराची परीपूर्ती होणार होती. त्यात प्रामुख्याने स्त्रीयांना घटस्फोट घेतल्यास पोटगी मिळण्याचा अधिकार, आंतरजातीय विवाहास मान्यता, स्त्रीयांना स्वतःचा वारसा निश्चित करण्याचे अधिकार व हक्क मिळणार होते. यामुळे बाबासाहेब हे बीलपास करण्यासाठी उत्सुक होते.

त्यामुळे २४ फेब्रुवारी १९४९ रोजी त्यांनी जेव्हा हे बील लोकसभेत मांडले तेव्हा लोकसभेच्या गॅलरीत अनेक स्त्रीया उपस्थित होत्या. तेव्हा यासंदर्भात बरीच चर्चा होऊन अनेकांनी या बीलास विरोध केला. खुद राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद तसेच सरदार वल्लभभाई या मोठ्या नेत्यांनीही त्यास विरोध दर्शविला इतकेच नाही व श्रीमती शांतिदेवी यांनी तर याविरूध्द उपोषणही सुरू केले. कांग्रेसमध्येच या संदर्भात दोन गट निर्माण होऊन त्यावर अनेक दिवस प्रदिर्घ चर्चा व भाषणे झाली पंतप्रधान प. नेहरू हे सुरवातीला या बीलाचे समर्थक होते परंतु पुढे त्यानाही पक्षातील नेत्यासमोर झुकावे लागले व शेवटी हे बील पास होऊ शकले नाही. याच मनस्वी दुःख डॉ. आंबेडकरांना झाले. लोकसभेतील या हिंदु विधेयकाची होणारी वाताहत पाहून बाबासाहेब संतापले व याच काळात निवडणूकीमूळे प. नेहरूनी या विधेयकावरील चर्चेला स्थागिती दिल्यामुळे २७ सप्टें १९५१ रोजी बाबासाहेबानी मंत्रीपदाचा राजीनामा दिला व नेहरू आणि कॉग्रेसच्या ध्येयधोरणावर मोठ्या प्रमाणात टिकाही केली. या बीलाच्या माध्यमातून भारतीय स्त्री मुक्तीचे स्वप्न बाबासाहेब पाहत होते त्याचा चुराडा झाला ही गोष्ट बाबासाहेबाच्या जीव्हारी लागली. पुढे सरकारने या कायद्याचे चार भाग करून त्याचे कायद्यात रूपांतर करण्यात आले व यातूनच (१) हिंदु विवाह कायदा १९५५ (२) हिदु वारसा हक्क कायदा १९५६ (३) हिदु अज्ञान पालकत्व कायदा १९५६ (४) हिदु दत्तक व पोटगी कायदा असे चार कायदे अस्तित्वात आले.

या बीलाच्या संदर्भात सरन्यायाधिश गजेंद्रगडकर म्हणतात, 'हिंदु कोड बील लोकसभेपुढे असतांना या बीलातील मूलभूत तत्वांबदल जनतेला जागृत करण्याचा पुरोगामी विचार सरणीच्या लोकांनी विशेष प्रयत्न केला नाही असे मला वाटते व त्याचाच परीणाम हिंदू कोड बील हे नुसते बिल राहिले व त्याचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नाही. हिदु कोड बीलाचा पराभव म्हणजे स्वातंत्र्य युगातील बुध्दीवादाचा झालेला ह्दयविदारक पराभव होय".

बाबासाहेब हिदु कोड बीलाबद्दल स्त्रीयाच्या बाबतीत म्हणतात 'आजच्या जगात संपत्तीचा स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रीयांना संपत्तीत वारसा मिळत नाही तोवर त्यांची गुलामगीरी संपनार नाही. त्यादृष्टीने हिंदु कोड बीलात मी तरतूदही केली होती... तसेच स्त्रीयांच्या घटस्फोटाचीही त्यात तरतूद करून दिली होती... त्या बीलात स्त्रीयांच्या हिताच्या दृष्टीने सर्व बाबीची तरतूद आहे. लग्नात किंवा दत्तक घेण्याच्या बाबतीत जातीभेदाचे बंधन नसावे हे मुख्य तत्व मांडले होते... एकमेकांवरील प्रेमामुळे जर कोणाला आंतरजातीय विवाह करावयाचा झाला किवा परजातीतील मुलगा दत्तक घ्यायची इच्छा झाली तर तसे करण्यास स्मृतीमुळे जी बंदी होती ती या बीलाने काढून टाकली होती... स्त्रील. घटस्फोट देण्याची या बीलाने मूभा देण्यात आली. त्याप्रमाणे स्त्री हिताच्या तरतुदी केल्या आहेत. नवऱ्याच्या मालमत्तेची पूर्ण मालकी त्यांच्या पत्नीलाच मिळाली पाहिजे..."

परंतु या बीलाला स्त्रीयानीच विरोध करावा व ते मंजूर करण्यास स्त्रीयांनी कोणतीही हालचात करू नये, उत्सुकता दाखवू नये याबदल बाबासाहेबाना खेद वाटतो. पार्लमेंट मधील स्त्रीयांनीही याबाबत कुठलाही पाठींबा न देता जागरूकताही दाखविली नाही व कोणत्याही स्त्रीने हे बील चांगले आहे. असे सांगण्याचे धारीष्य दाखविले नाही याच ही दुःख बाबासाहेबाना आहे. या बीलाच्या संदर्भात सल्ला देतांना बाबासाहेब म्हणतात, 'आपण येणाऱ्या बीलातील प्रत्येक कलम नीट तपासून पाहा. निव्वळ आंतरजातीय विवाहाचे कलम पाहून चालणार नाही. तेवढेच कलम नवे व बाकीचे कायदे जुनेच राहिले तर अनर्थ ओढवतील आंतरजातीय स्त्री-पुरूषापासून झालेल्या संततीस आपल्या जुन्या शास्त्राप्रमाणे संपत्तीची

मालकी मिळत नाही म्हणून अशी संतती कायदेशीर ठरवून तीला मालकी देण्याची तरतूदही कायद्यात्र करून घेतली पाहिजे" असा दुरदृष्टीचां विंचारही बाबासाहेब बोलून दाखवितात.

मुल्यमापन :—

बाबासाहेबांच्या ऐतिहासिक कामगीरीचा विचार करता ते अर्थतज्ञ, समाजतज्ञ, शिक्षणतज्ञ, पत्रकार, कायदेतज्ञ, समाजसुधारक, मुत्सद्दी इत्यादी अनेक पैलू त्याच्यां जीवनाचे समोर येतात त्याच बरोबर ते स्त्रिमुक्तीचे पुरस्कर्तेही होते स्त्रीयांच्या कल्याणासाठी व प्रगतीसाठी त्यांनी कायद्याचा आधार घेऊन अनेक सुधारणा व हक्क अधिकार व सवलती त्यांना मिळवून दिल्या. यामुळे ते कर्ते स्त्रीसुधारक ठरतात. जातीव्यवस्थेने शुद्रावर व अस्पृशांवर जो अन्याय केला त्यांनी बाबासाहेबांना जाणीव होती. म्हणून ते नष्ट करण्यासाठी अस्पृशांना त्यांचे राजकीय व सामाजीक हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. मात्र हिदु समाजव्यवस्थेने शुद्राप्रमाणेच स्त्रियावरही तितकाच अन्याय केला याची ही जाणीव बाबासाहेबांना होती म्हणूनच पुरूषाबरोबर स्त्रीयांनाही हक्क मिळवून देण्यासाठी ते झटले. त्यासाठी कायद्याचा आधारे हिदु कोड बील संसदेत मांडले परंतु त्यांच्या विचारांचा पराभव त्यांना व्यवस्थेसमोर पत्करावा लागला. त्यासाठी त्यांनी केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा दिला व काग्रेसवर टिकाही केली. यावरून त्याच्यातील बाणेदारपणा पाहावयास मिळतो. हिदु कोड बीलाचा पराभव केवळ संसदीय पराभव नव्हता तर क्रांतावादी सामाजीक विचारांचा पराभव होता बाबासाहेब ज्या सामाजीक परीवर्तनसाठी लढले त्या परीवर्तनवादी ध्येयवांदाचा पराभव होता.

जी गोष्ट मनाला पटली नाही ती त्यांनी कधीही स्विकारली नाही म्हणून धर्मातरांच्या आंदोलनात देह विक्रय करणाऱ्या स्त्रीयांनी आपला व्यवसाय सोडून यात सामिल व्हावे नाहीतर त्यांनी धर्मातर करू नये असे फटकारण्यासाठी मागेपुढे पाहिले नाही. त्यांनी व्यवसाय सोडला नाही तर व्यवसायाचे उच्चाटन करण्याची धमकीही त्यांनी त्या स्त्रीयांना दिली यावून स्त्री सुधारणे बाबतची त्यांची तळमळ दिसुन येते व त्यांनी चारीत्र्याला महत्व देऊन त्याला धक्का लागू नये याची काळजी घेण्याचा सल्लाही स्त्रीयास देतात.

बाबासाहेब हे आर्तजातीय विवाहाचे पुरस्कर्ते होते म्हणून त्यांनी कायद्याने त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. संततीनियमनाच्या बाबतीतही स्त्रीयाना जास्त मुलें होऊ देऊ नका असा सल्ला देतांना मुला प्रमाणेच मुलीच्याही शिक्षणाचा आग्रह धरतात.

एकुनच बाबासाहेबाच्या स्त्रीमुक्तीविचार व कार्यामुळे समाजात पुढील काळात स्त्रीयासाठी कायदे होऊन अनेक अधिकार त्यांना प्राप्त झाले. आज स्त्रीयांना जे सकारात्मक स्वातंत्र्य मिळाले आहे. स्त्रीया अनेक क्षेत्रात जाऊन प्रगती करीत आहे. यामागे निश्चितच बाबासाहेबाचे मोलाचे योगदान आहे. त्याचे कार्य या क्षेत्रात मौलीक आहे व स्त्री पुरूष समानतेसाठी त्यांनी केलेले कार्य गौरवास्पद आहे यावरून ते खऱ्या अर्थाने 'स्त्रीउद्धारक' ठरतात.

**संदर्भग्रंथ**

(१) कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पापुलर प्रकाशन, मुंबई, २००६
(२) केळकर भा कृ, 'भारतभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर' सुगावा प्रकाशन पुणे, १९९४
(३) गर्गे स.मा., 'भारतीय समाजविज्ञान कोश', मेहता पब्लीशींग हाऊस, पुणे, २००७.
(४) गणवीर रत्नाकर , 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बील', नेहा प्रकाशन, नागपूर, २००४.
(५) गायकवाड किशोर 'घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर', श्रीगंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०१०.
(६) डॉ. गायकवाड ज्ञानराज, 'महामानव—डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', रिया पब्लिकेशन, कोल्हापुर, २०१६
(७) डॉ. घोरमोडे के. यु व घोरमोडे कला, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सफलता व कृतीप्रवणता', विद्याप्रकाशन नागपूर.

लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

Scanned with OKEN Scanner